# 'विंड व्हेंटिलेटर'ने ऊर्जाबचत



**घर, कार्यालय वा कंपनीच्या शेडमधील गरम हवा बाहेर जावी म्हणून बहुतेक ठिकाणी 'एक्झॉस्ट' पंखे बसविले जातात. यासाठी वीज वापरली जाते. विजेचा हा खर्च होऊ नये म्हणून नगरच्या 'श्रीजी हेवी व प्रोसेस' या उद्योगसमूहाचे संचालक दिनेश अग्रवाल यांनी 'विंड व्हेंटिलेटर' हे उत्पादन विकसित केले आहे. पूर्णपणे हवेवर चालणाऱ्या या उत्पादनाने ऊर्जा बचतीच्या राष्ट्रीय कार्यात मोलाचा वाटा उचलला आहे.**



**दिनेश रमेशचंद्र अग्रवाल**

**शिक्षण** : एम. ए. (इकॉनॉमिक्स).

**क्षेत्र** : उद्योग.

**श्रीराम जोशी**

**यशाकडे वाटचाल :**

शुगर इंडस्ट्रीसाठी लागणाऱ्या 'बॉईलिंग हाउस इक्विपमेंट'ची निर्मिती करतानाच अग्रवाल यांनी 'रिफाइंड शुगर मशिनरी' विकसित केली. लंडनच्या 'टीएलपीटी' इंडस्ट्रीचे मार्गदर्शन त्यांनी त्यासाठी घेतले. साखर उद्योगाशी संबंधित ही उत्पादने महाराष्ट्र, गुजरात व पंजाब- हरियाणासह थायलंड, व्हिएतनाम, फिलिपीन्स, इंडोनेशिया, फिजी, कंबोडिया, श्रीलंका व आफ्रिकन देशामध्ये निर्यात होतात. केंद्र सरकारच्या इंजिनिअरिंग एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलने तब्बल पाच वेळा 'श्रीजी'ला उत्कृष्ट निर्यातदाराचा पुरस्कार दिला आहे. साखर उद्योग व श्रीजी हे एकमेकांशी पूरक झाल्याचे चित्र आहे.

**यशाची कथा :**

'श्रीजी'ने सुपे येथे ट्रान्समिशन टॉवर प्लँट प्रकल्प सुरू केला असून, वीजवाहक तारा वाहून नेणारे दणकट खांब केंद्र व राज्य सरकारच्या ऊर्जाविकास धोरणात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. सौर ऊर्जा विकासांतर्गत 'सोलर' यंत्रणेसाठी स्ट्रक्चर डिझायनिंग व पॅनेल निर्मितीचे काम सुरू करण्यात आले असून, लवकर जर्मनी व स्पेनमधील तज्ज्ञांच्या सहकार्याने सोलर यंत्रणा निर्मिती सुरू होणार आहे. याशिवाय थायलंड येथील 'एसएमकेवाय' कंपनीच्या सहकार्याने 'शुगरकेन हार्वेस्टर' म्हणजे ऊसतोडणी यंत्र निर्मितीचा प्रकल्प चेन्नई येथे सुरू करण्यात आला आहे. साखर उद्योगाला भविष्यात ऊसतोडणी मजुरांची कमतरता भासणार असल्याने ऊसतोडणी यंत्रांची गरज निर्माण होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतीला तसेच ऊस लागवडीला पूरक ठरेल, अशी रचना या तोडणी यंत्रांची करण्यात आली आहे. सध्या नगर जिल्ह्यात या यंत्रांची प्रात्यक्षिके कारखान्यांच्या मदतीने शेतकऱ्यांना दाखविली जात आहेत. या यंत्राची किंमत शेतकऱ्यांना तसेच कारखान्यांना परवडावी यासाठी नगर- औरंगाबाद रस्त्यावरील पांढरीला पूल येथील नियोजित फूडपार्कमधील इंजिनिअरिंग विभागात स्वतंत्र युनिट करण्याचीही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

तसेच, नगरच्या औद्योगिक परिसरात फिरताना कंपन्यांच्या मोठमोठ्या पत्र्यांच्या शेडस् व त्यावर धुराच्या चिमणीसारखे गरगर फिरणारे स्टील रंगातील गोल घुमट लक्ष वेधून घेतात. सतत वेगाने फिरणाऱ्या या गोल घुमटांचे बारकाईने निरीक्षण केल्यावर कळते, की हे वेगळ्याप्रकारचे 'एक्झॉस्ट' फॅन आहेत. बाहेर वातावरणातील हवा जेवढ्या वेगाने वाहते, त्या वेगाने फिरणारे हे गोल घुमट त्याच गतीने खालच्या बाजूला असलेल्या पत्र्याच्या शेडमधील गरम हवा आपल्याकडे ओढून घेऊन बाहेर टाकते. २४ तास गुणिले ३६५ दिवस असे अखंड फिरत राहणारे हे आगळेवेगळे 'विंड व्हेंटिलेटर' नगरचे उद्योजक दिनेश अग्रवाल यांनी विकसित केले आहे. आतापर्यंत पाचशेच्यावर कारखान्यांत ३५ हजारावर युनिटची विक्री त्यांनी केली असून, हिरोहोंडा कंपनीने त्यांच्या एका शेडमध्ये एक्झॉस्ट फॅनसाठीच्या वीज बिलाचा साडेदहा लाखाचा खर्च विंड व्हेंटिलेटरमुळे कायमस्वरूपी कमी झाल्याबद्दल

**कौटुंबिक पार्श्वभूमी :**

दिनेश अग्रवाल हे मूळचे आग्र्याचे. वडिलांचा साखर खरेदी-विक्रीचा व्यवसाय. मोठे बंधू गोपाळ अग्रवाल हे शुगर टेक्नॉलॉजिस्ट असल्याने सारा परिवार साखर उद्योगाशी संबंधित. गोपाळ अग्रवाल हे नगर जिल्ह्यातील गोदावरी शुगर (साकरवाडी) व राहुरी साखर कारखान्यात नोकरीला होते. त्यामुळे १९७६मध्ये दिनेश अग्रवालही नगरला आले. १९७५च्या सुमारास नगर- मनमाड रस्त्यावरील नागापूरजवळ नगरची औद्योगिक वसाहत मंजूर झाली होती. याच ठिकाणी अग्रवालांनी एक प्लॉट घेतला व शुगर इंडस्ट्रीला आवश्यक साहित्य निर्मितीचा उद्योग सुरू केला. वडिलांनी त्याकाळी दिलेले दोन लाख व बँकेकडून आणखी दोन लाखाचे कर्ज घेऊन 'श्रीजी ग्रुप'चे ३५ वर्षांपूर्वी लावलेले रोप आज वृटवृक्षाप्रत पोचले आहे. 'श्रीजी प्रोसेस' व 'श्रीजी हेवी' हे नगरच्या औद्योगिक क्षेत्रातील तसेच 'श्रीजी हेवी' (सुपे, ता. पारनेर, नगर) व 'श्रीजी हेवी' (चेन्नई) या कारखान्यांचा विस्तार झाला आहे. 'श्रीजी'च्या सर्व कारखान्यांत मिळून पाचशेच्यावर लोकांना रोजगार मिळाला आहे. गोपाल अग्रवाल, दिनेश अग्रवाल व अनिल अग्रवाल या तिघा बंधूंच्या मदतीला आता अभियांत्रिकी व व्यवस्थापनाचे उच्च शिक्षण घेतलेली त्यांची मुले सचिन, सौरभ, सुदीप व सागर आली आहेत.

अग्रवाल यांचा विशेष उल्लेख अहवालात केला आहे.

**वेगळेपण :**

'श्रीजी'ने विकसित केलेले 'विंड व्हेंटिलेटर' ही 'एक्झॉस्ट' फॅनचे कार्य करणारी यंत्रणा उद्योगजगतात लोकप्रिय झाली आहे. नगरच्या बहुतांश सर्वच औद्योगिक कारखान्यांनी तिचा अवलंब केला आहे. याशिवाय हिरो होंडा, मारुती, टाटा मोटर्स, क्रॉम्प्टन, ह्युंदाई मोटर्स, भारत फोर्ज, डाल्को अशा देशभरातील नामवंत उद्योग समूहांनीही स्वीकारली आहे. 'एक्झॉस्ट' फॅनकरिता लागणारी वीज यामुळे वाचली असून, त्यावरचा खर्चही कमी होऊन पर्यावरण रक्षणातही भर पडली आहे.

**संघर्ष काय? :**

वीज बचत करणाऱ्या 'विंड व्हेंटिलेटर'ला सरकारकडून अनुदानाची गरज नाही; पण सेल्स टॅक्स व एक्साईज ड्यूटी मिळून आकारला जाणारा २२ टक्क्यावर टॅक्स जरी कमी केला तरी कंपन्यांतून या सुविधेला मागणी वाढेल, असे त्यांचे मत आहे. बँकांचे वाढलेले व्याजदर तसेच निर्यातीला पूर्वी मिळणारा इन्कमटॅक्स बेनिफिट रद्द झाल्याने बहुतांश उद्योग, जेथे कर सवलत मिळते अशा 'एसईझेड' प्रकल्पाकडे धाव घेत आहेत. गुजरातमध्ये सवलती व सुविधा मिळतात म्हणून तिकडे काहीजण जात आहेत वा तशा तयारीत आहेत. असे जर सगळीकडेच झाले तर नगरच नव्हे; तर पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सोलापूर अशा शहरांच्या विकासात योगदान देणारी तेथील इंडस्ट्री ओस पडेल. परिणामी स्थानिक पातळीवर रोजगाराची समस्या निर्माण होईल, हे वास्तव लक्षात घेतले पाहिजे. त्यानुसार सरकारची धोरणे असली पाहिजे, असे मतही उद्योजक म्हणून अग्रवाल व्यक्त करतात.

**तरुणांना काय सांगाल :**

**युवापिढीने प्रत्येक काम प्रामाणिकपणे व मेहनतीने केले तर यश मिळणे अवघड नाही. संगणक व लॅपटॉपवर रमणाऱ्या युवापिढीकडे कल्पकता आहे, नाविन्याकडे ओढ आहे; पण 'फिल्ड'वर काम करण्यास मात्र फारशी उत्सुकता नसते. माझ्याकडे तांत्रिक शिक्षण नसतानाही केवळ यशस्वी व्हायचे याचा ध्यास घेतल्याने उत्पादन प्रक्रिया समजून घेतली व त्यामुळेच अडचणी जाणवल्या आणि त्या सोडविण्याचे मार्गही सापडले. म्हणून युवापिढीनेही आपण ज्या क्षेत्रात शिक्षण घेतले, त्या क्षेत्रावर आधी मनापासून प्रेम करावे व या क्षेत्रातच नावीन्य जपताना कष्ट करण्याची तयारी ठेवल्यास तसेच प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यास प्राधान्य दिल्यास त्यांना यश मिळणे अवघड नाही.**

**दिनेश रमेशचंद्र अग्रवाल** : ९८२२०४०४४८.



**खुलासा :** पान ४० वरील मृण्मयी तिरोडकर यांच्यावरील लेख गणेश जावडेकर यांनी लिहिलेला आहे.